स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या ग्रंथालयास संशोधनआराखडा सादर

विषय : **भूगोल (geography)**

संशोधन शिर्षक

" संशोधनाचा विषय पालघर जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास

संशोधकाचीमाहिती

नाव	**श्री. विशाल विजयकुमार सोनकांबळे**
मो. न.	८०८७६८१३७३ / ९२८४६८७४३५
ई – मेल	vishalshyam28.vs@gmail.com
संवर्ग	अनुसूचित जाती (एस. सी.)
दिव्यांग	नाही.

मार्गदर्शकाची माहिती

नाव	**प्रा. डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी**
मो. न.	९४२१५२७१८९
ई – मेल	kulkarnimukesh007@gmail.com
संशोधन केंद्र	महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

[Document title]

[Document subtitle]

Abstract

[Draw your reader in with an engaging abstract. It is typically a short summary of the document. When you're ready to add your content, just click here and start typing.]

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा

प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीकरीता संशोधन आराखडा

संशोधक

श्री.विशाल विजयकुमार सोनकांबळे

(एम.ए.भूगोल सेट,नेट. एम.एड. सेट,नेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी

(एम.ए. पीएच.डी. नेट.)

सहाय्यक अधिव्याखता, भूगोल विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय ,उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ता. उदगीर (४१३५१७) जि. लातूर (महाराष्ट्र)

२०१८

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास

प्रस्तावना

भारत हा विविधीतेने नटलेला विविध जाती धर्म पंथ यांनी संपन्न असलेला खंडप्राय देश आहे. भारताचे क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ. कि.मी. आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात ७ वा क्र. लागतो भारताची उत्तर दक्षिण लांबी ३२१४ कि. मी. व पूर्व पश्चिम लांबी २७९९ कि.मी. आहे. भारताला तिन्ही बाजूने समुद्राने वेढलेले आहे. व ५१,६८१ कि.मी. चा समुद्र किनारा लाभलेला आहे. सुमारे १५००० चौ.कि.मी. समुद्री क्षेत्र लाभलेले आहे. भारत जैविक व वन्यजीव साधनसंपत्तीच्या विपुलतेने व सागरी सागरी जैविक आणि खनिज संपत्तीने समृद्ध देश आहे. भारतात आज २९ घटक राज्ये व ७ केंद्र शासित प्रदेश आहेत. अशा या विशाल व खंडप्राय देशामध्ये भौतिक पर्यावरणामध्ये कमालीची विविधता आढळते भारतात थर चे वाळवंट आहे तर सियाचीन, काश्मीर मध्ये -५० अंश तापमान आहे हिमालय, पश्चिम घाट, सातपुडा, अरवली सारख्या पर्वतमाला आहेत तर गंगा,सिंधू, गोदावरी, भ्रम्हपुत्रा सारख्या विश्व विख्यात नद्या हि आहेत. नद्यांच्या खोऱ्यांचा सुपीक मैदानी प्रदेश आहे तर दुसऱ्या बाजूला राजस्थान चे वाळवंटी मैदान आहे. पूर्वेला घनदाट अरण्याचा प्रदेश आहे तर पश्चिमेला कच्छ चा दलदलीचा विराण प्रदेश आहे. अश्या या प्राकृतिक विविधतेने नटलेल्या देशात अपेक्षेप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक विविधता हि मोठ्या प्रमाणावर आढळून येते. भारतात जगातील बहुतेक सर्वच धर्माचे लोक राहतात. तसेच भारतात जगातील सर्वात जास्त भाषिक विविधता आढळून येते. भारतात सामाजिक व सांस्कृतिक विविधता कमालीची आहे परंतु अशी सामाजिक सांकृतिक विविधता असताना भारतातील बंधुभाव व सर्वधर्मसमभाव वाखण्याजोगा आहे. आपल्या देशात विज्ञानाच्या जोरावर वेगाने प्रगती करणारा आधुनिक समाज आहे तर दुसऱ्या बाजूला

अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेल्या व उदरनिर्वाह साठी सतत स्थलांतर करणाऱ्या विभिन्न जनजाती देखील आहेत. एका बाजूला आधुनिकतेच्या जोरावर

विकासाचे नवीन नवीन क्षेत्र पादांक्रत करणारा समाज तर दुसऱ्या बाजूला विकासापासून व आधुनिक सेवा सुविधापासून वंचित असलेला व जंगलात, दऱ्या खोऱ्यात राहणारा आदिवासी समाज आहे.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र मिळाले त्यानंतर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनाचा मार्ग भारतीय राज्यकर्त्यांनी स्वीकारला आणि समाजवादी समाजरचना तत्वाचा अवलंब करण्यात आला. समाजातील प्रत्येक घटक, सर्व जाती धर्माच्या लोकांच्या विकासासाठी व सर्व स्तरातील कुटुंबासाठी आवश्यकतेनुसार विविध योजनांची आखणी व आमलबजावणी करण्यात आली. भारत सरकारने जाणीवपूर्वक पर्वतमय,डोंगराळ व जंगलयुक्त प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींच्या विकासासाठी अधिक प्रयत्न केले आहेत. आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्याविषय सुधाराच्या वेगवेगळया योजनाची आखणी करून अंमलबजावणी केली आहे व आजतागायत सुरु आहे.

आदिवासी परिचय

आदिवासी शब्दाची उत्पत्ती व अर्थ

आदिवासी संज्ञा ही इंग्रजीतील “ **TRIBES** “ या संज्ञाचे मराठी रूप आहे. **Tribes** हा शब्द १२ व्या शतकात मध्यकालीन इंग्रजी साहित्यामध्ये **“ TRIBUZ ”** या संज्ञा ने निर्देशित केला गेला. या शब्दाचे मूळ लॅटिन भाषेत आहे . या शब्दाचा लॅटिन भाषेत अर्थ तीन भाग, ज्यात प्राचीन लॅटिन समाज विभागला होता(१.Ramnes 2.Tities ३.Luceres) असा होतो.

भारताला स्वतंत्र मिळाल्यापासून सर्वच क्षेत्रात भारताने नेत्रदीपक कामगिरी केलेली आहे. यामुळे देशाच्या आर्थिक,सामाजिक व पारंपारिक वैशिष्ट्यात बदल झालेले दिसून येतात. या विकास प्रक्रियेमुळे देशातील विविध जाती जमातीच्या लोकांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास

झालेला दिसून येतो परंतु या विकासापासून काहीसा दूर राहिलेला, दूर जंगलात, दऱ्या खोऱ्यात राहणारा आदिवासी समाज आजूनही पारंपारिक पद्धतीनेच जीवन जगताना दिसून येतो. आदिवासी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न वेगवेगळया सरकारांनी व सामजिक संघटनांनी केलेला आहे आणि आता त्याचे सकारात्मक परिणाम हि आपणास दिसून येतात. आदिवासी समुदायाला मुळचे रहिवाशी किंवा भूमिपुत्र

असे संबोधले जाते. या जमाती विशिष्ट भू-प्रदेशात राहतात व विशिष्ट बोलीभाषा बोलतात, त्यांच्यात विशिष्ट संस्कृती व रीतीरिवाज उदयास आलेले आहेत. आपल्या रूढी परंपरा बद्दल या समाजात कमालीची निष्ठा पहावयास मिळते. विवाह, व्यवहार तसेच राजकीय प्रभुत्व याबद्दल ते कमालीचे ताठर भूमिका घेतात. आजपर्यंत हा समाज शिक्षण, आरोग्यसेवा व विकासापासून वंचित राहिलेला आहे याला काही प्रमाणात त्यांची कट्टर संस्कृती निष्ठा सुद्धा एक कारण आहे. अलीकडील तंत्रज्ञानाच्या काळामध्ये विश्व एक खेडे स्वरुपात आले आहे तरीही आपण आपल्या देशातील, राज्यातील, जिल्ह्यातील आदिवासी बांधवाना जवळ करू शकलो नाही. अशा आदिवासी समुदायाबद्दल अधिकची माहिती आपण पाहू.

सैद्धांतिक पार्श्वभूमी

“ आदिवासी हा देशाचा आदी पुरुष आहे त्याची जीवन पद्धती आणि संस्कृती त्यांची स्वतःची आहे. त्यांची कला, सभ्यता आणि जीवन नियम त्यांचे आहेत. अज्ञान, अंधश्रद्धाने पोखरलेला आदिवासी श्रमस्थानी आहे. विश्वाच्या व्यवहारामागे अद्वैत आणि अलोकिक शक्ती असते यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. त्यांचे साहित्य मौखिक परंपरेने निर्माण झालेले आहे व ते मनुष्य व निसर्ग याविषयी कुतूहल निर्माण करते.

भारतामध्ये आर्याच्या आगमनापूर्वी आदिवासी या प्रांतांचे मूळ निवासी होते, ह्या भूमीचे भूमिपुत्र होते . त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक तत्त्वज्ञान होते . परंपरा व रितीरिवाजाना अनुसरून त्यांची जीवन पद्धती होती नियम होते नियम तोडणाऱ्याला कठोर शिक्षा केली जायची. आदिवासींची

विकसित बोलीभाषा होती आणि त्या बोलीभाषेतील लिपीबद्ध (विविध चिन्हे व खुणा) साहित्य होते. आर्यांच्या आगमना नंतर वेळोवेळी आर्यांशी संघर्ष होत राहिला त्यात काही आदिवासी समूहाने आर्यासमोर हार पत्करून त्यांची जीवनशैली व संस्कृतीचा स्विकार केला व त्यासमवेत जीवन जगू लागले. परंतु काही समूहाने आपली संस्कृती, चालीरीती च्या रक्षणार्थ जंगल दऱ्या –खोऱ्या मध्ये जिथे आर्यांचा वावर असणार नाही अशा दुर्गम क्षेत्रात स्थायिक झाले आणि आज हि ते आपले कष्ट प्रद जीवन अशाच ठिकाणी जगत आहेत.

स्वातंत्र्यानंतर राज्यकारभार नीती नियमाने चालवण्यासाठी राज्यघटना तयार करण्यात आली भारतीय राज्य घटनेत आदिवासी विकासासाठी विशेष सवलतीची तरतूद करण्यात आलेली आहे मानवी प्रबोधनाच्या चळवळी सुरु झाल्या आणि आदिवासी च्या सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक व आर्थिक विकासास चालना मिळाली. जसा जसा प्रगत समाज आदिवासी समाजाच्या जवळ जाऊ लागला तस तसे आदिवासीबद्दल कुतूहल व ज्ञानवाढण्यास सुरुवात झाली सर्वप्रथम आपण आदिवासी संबंधीत वेगवेगळया संकल्पना पाहू.

आदिवासी संज्ञा

वनवासी : अर्धनग्न वेशात शिकारीसाठी सतत वनात भटकंती असल्यामुळे.

आरण्यक : उपहासाने अरण्यात राहणारे अश्या अर्थाने.

धरतीचे लेकरे : सहानभूतीने.

गिरीजन : पर्वत पायथ्याशी दऱ्या- खोऱ्यात हजारो वर्ष वास्तव्य केल्यामुळे.

मूलनिवासी : आदिवासींचे कैवारी पूज्य. ठक्कर बाप्पा व महात्मा गांधी यांचे मत.

“ आदिम” : डॉ.भाऊ मांडवकर व डॉ.गोविंदगारे यांनी वन्य जमातीसाठी वापरलेले शब्द.

जंगलाचे राजे : सुप्रसिद्ध समाजसेविका सौ.नारगोळकर व श्याम नारगोळकर यांनी म्हटले.

Aboriginal : पाश्च्यात्य विद्वानांनी म्हटले आहे.

“ अनुसूचितजमात” : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत म्हटले आहे.

आधुनिक विचारांनी प्रगत स माज व आदिवासी समाज यांना जवळ आणले आहे. द्वितीय विश्व युद्धानंतर १९५०-६० च्या दशकात आधुनिकीकरण संकल्पनेला महत्व प्राप्त झाले. इंग्लंड मधील औद्योगिक क्रांती आणि काही प्रमाणात फ्रेंच राज्यक्रांती मुळे आधुनिकता या संकल्पनेच्या उदयास हातभार लागला. आधुनिकीकरणाच्या संकल्पनेत समाजाची बौद्धिक प्रगती दिसून येते, विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभाव असतो, कारण आणि तर्कशक्ती निर्माण होते, मानव विकास हा एकमेव हेतू असतो पर्यावरणावर चे निर्भरता कमी होते, भेदभावरहित समाज निर्माण होण्यास सुरुवात होते. समान संधी, राजव्यवस्थेवरचे धार्मिक प्रभाव कमी होऊन धर्मनिरपेक्ष लोकशाही चा उदय होतो. शेती यांत्रिक व उच्च तंत्रज्ञान च्या साह्याने केली जाते व औद्योगिक रणाचा ओघ सुरु असतो. अश्याप्रकारे आधुनिकीकरण म्हणजे नवीन सामाजिक, आर्थिक , राजकीय धार्मिक व वैचारिक प्रणाली चा संच होय जो परंपरा गतसंचापासून पूर्णतः वेगळा आहे . या आधुनिकीकरण संकल्पनेने व त्याचा औद्योगिककीकरण या पाडसाने परंपरागत भारतीयांच्या विचार प्रणालीमध्ये कमालीचे परिवर्तन केले आहे त्यातूनच वेगवेगळया सामाजिक सुधारणा घडू लागल्या व देशाला प्रगतीपथावर न्यायचे असेल तर तळागाळातील भारतीयांचा विकास हे तत्व समोर आले व त्यालाअनुसरून महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात औद्योगिककीकरण सुरु झाले आज या औद्योगिकिकरणाचा ओघ आदिवासी क्षेत्रापर्यंत पसरत आहे .यामुळे प्रगत समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विचारसरणीचा प्रभाव आदिवासींवर व त्यांच्या विचारसरणीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी

सागरी डोंगरी आणि नागरी अंग असलेल्या देशातील सर्वात मोठ्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून १ ऑगस्ट २०१४ पासून नव्याने पालघर हा राज्यातील ३६ वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. कोकण च्या उत्तर भागात असलेला पालघर जिल्हा पूर्वेकडे असणार्या सह्याद्री पर्वत रांगा व पश्चिमेकडे अरबी समुद्र किनारपट्टी दरम्यान पसरला आहे. पालघर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २९,९०,११६ एवढी आहे. पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत. त्यामध्ये जव्हार, मोखाडा, तलासरी, वसई, विक्रमगड, पालघर, डहाणू आणि वाडा तालुक्यांचा समावेश होतो. पालघर जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ४६९६९९ हेक्टर असून त्यामध्ये एकूण १००८ गावे व ३८१८ पाडे आहेत तसेच ४७७ ग्रामपंचायती आहेत. काथोडी, कातकरी, कोकणा, कोकणी, कोळी, महादेव कोळी, मल्हार, वारली, ठाकूर, दुबळा, कोळी ढोर, ठाकरे, कोळी इत्यादी आदिवासी जमाती आहेत. पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंखेचे तालुकानिहाय एकूण लोकसंखे शी प्रमाण आणि एकूण लोकसंख्या खालील सारणीच्या साह्याने समजून घेऊ .

आदिवासी लोकसंखेचे तालुकानिहाय एकूण लोकसंखेशी प्रमाण

अ. क्र.	तालुके	एकूण लोकसंख्या	आदिवासींची लोकसंख्या			एकूण लोकसंखेशी प्रमाण (%)
			महिला	पुरुष	एकूण	
१	वसई	१३४३४०२	४९३७७	४८९२१	९८२९८	७.३२
२	पालघर	५५०१६६	८४७२८	८३४२४	१६८१५२	३०.५६
३	वाडा	१७८३७०	५०५४९	५११६०	१०१७०९	५७.०२
४	डहाणू	४०२०९५	१४२०६२	१३५८४२	२७७९०४	६९.११
५	तलासरी	१५४८१८	७१५७४	६८६९९	१४०२७३	९०.६१

६	जव्हार	१४०१८७	६५१८२	६३२८०	१२८४६२	९१.६४
७	विक्रमगड	१३७६२५	६३७२२	६२६४६	१२६३६८	९१.८२
८	मोखाडा	८३४५३	३८५९६	३८२४६	७६८४२	९२.०८
	एकूण	२९९०११६	५६५७९०	५५२२१८	१११८००८	३७.३९

(स्त्रोत : भारताची जनगणना २०११ – जिल्हाधिकारी कार्यालय संकेतस्थळ मुखपृष्ठ पालघर जिल्हा)

२. संबंधीत साहित्याचा आढावा

१.नाग आणि सक्शेना (१९५८)

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा पद्धतशीर अभ्यास करण्याचे श्रेय नाग आणि सक्शेना यांना जाते. यांनी मध्यप्रदेशच्या विभिन्न भागांचे अध्ययनासाठी वेगवेगळे क्षेत्र निर्माण केले. जसे मंडला बिलासपुर , दुर्ग बकलाघाट ई. त्यांनी " बर्गा " या आदिवासी जमातीच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला.ज्यामध्ये त्यांनी आर्थशास्त्र चा सामान्य सिद्धांत तसेच त्यांच्या आर्थिक क्रियांचे स्त्रोत व त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास केला.

2. विद्यार्थी (१९७०)

यांनी आदिवासींच्या संस्कृतीवर नागरिकीकरणाचा प्रभावाचा अभ्यास केला. त्यांचा अभ्यास ' छोटा नागपूर च्या पठारावर मोठ्या प्रमाणात होणारी अभियांत्रीकिकरणाची गुंतागुंताची रचना आणि त्या अनुशंगाने त्या प्रदेशातील आदिवासींच्या सामाजिक आर्थिक बदल यांचे विश्लेषण करणे या प्रदेशातील मोठ्या प्रमाणात होणारे औद्योगीकीकरण लक्षात घेऊन तेथील आदिवासींच्या सामाजिक सांस्कृतिक प्रारूपामध्ये होणारे बदल अभ्यासले.

३.विमल शहा (१९६९)

यांनी भारतीय रिझर्व बँक च्या भारतीय ग्रामीन विकास आणि गुंतवणूक सर्वेक्षण (RBI) १९६२ यावर आधारित गुजरात राज्यातील आदिवासींची अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला. जो गुजरात शासन पुरस्कृत होता. शहा यांनी या अभ्यासासाठी २८ गावातील ११२० ग्रामीण परिवारांची निवड

करण्यात आली. या अभ्यासाने गुजरात च्या आदिवासी समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर प्रकाश टाकला. यात खालील खालील तथ्य समोर आले. १.त्यांच्या व्यवसाय निवडी मध्ये खूप कमी भिन्नता आहे. २. त्यांच्या संस्कृतीचे हस्तांतरण निरंतर सुरु आहे. ३.येथील आधुनिकीकरणासाठी खूप कमी गुंतवणूक करण्यात आली आहे. ४. जमिनीच्या उत्पादकता विकासाबद्दल या समाजात खूप कमी जागरूकता आहे. आणि बहुतेक लोक परंपरागत व्यवसायावर अवलंबून आहेत.

४.भगाडे पोपट मच्छिंद्र (२०१२)

“ ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन ” या संशोधनामध्ये शासकीय लाभांच्या योजनामुळे आदिवासी समाजाच्या राहणीमानात झालेली सुधारणा , आदिवासी समाजातील शैक्षणिक सुविधांच्या लाभाचा स्तर , आरोग्याच्या सुविधांची उपलब्धता , जीवनमानाचा स्तर या विषयावर कार्य करण्यात आले.

वरील संशोधनासाठी ठाणे जिल्ह्यातील ५०% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या ६ तालुक्यांची निवड करण्यात आली. जव्हार ,मोखाडा, विक्रमगड, तलासरी, डहाणू, वाडा या तालुक्यातील एकूण ६६ गावातील ३३० परिवारांची निवड नमुना म्हणून निवड करून संशोधन कार्य केले गेले. या संशोधनातून पुढील तथ्य समोर आले. आदिवासींचे राहणीमान मध्यम निम्न प्रकारचे आहे. विभक्त कुटुंब पद्धती असून परिवारांची संख्या साधारणतः ६ आहे. परंपरागत पोषाखाकडे यांचा कल आहे. या समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून आले. तसेच यांचा प्रमुख व्यवसाय शेती व मजुरी आहे. आदिवासी समाजात शिक्षणाबद्दल जागरूकता दिसून आली. ७२% आदिवासी डॉक्टर कडे उपचार घेतात तर ७% मांत्रिकावर विश्वास करतात तसेच २१% आदिवासी घरगुती उपचार घेताना निदर्शनास आले.

३. संशोधन विषयाचे महत्व :

मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये आदिवासी समुदायाच्या अभ्यासाला विशेष महत्व आहे. आदिवासी समुदाय हा त्या प्रदेशतील मूळ रहिवाशी असून त्याची ओळख भूमिपुत्र म्हणून आहे. आदिवासी लोकजीवन, संस्कृती यांचा अलीकडील काळामध्ये विकसित समाजाशी संपर्क येऊ लागला आहे त्यामुळे आदिवासींच्या जीवनपद्धती व संस्कृती वर होणाऱ्या परिणामाचे भौगोलिक विश्लेषण करणे महत्वाचे आहे.

भारतातील जवळजवळ सर्वच राज्यांमध्ये आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या ९८,८१,६५६ असून तिचे एकूण लोकसंखेशी प्रमाण १०.२०% आहे. महाराष्ट्रात औदोगीकीकर नाचा वेगही वाढलेला आहे. व औ द्योगिक पट्टे आदिवासी बहुल क्षेत्राजवळून किंवा क्षेत्रातून जात आहेत याचा विचार क रून आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या नियोजनबद्ध कृतीला वाव मिळेल.

पालघर हा नवीन जिल्हा म्हणून उदयास आलेला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार पालघर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या २९,९०,११६ एवढी आहे त्यात आदिवासी म्हणजेच अनुसूचित जमाती ची लोकसंख्या ११,१८,००८ एवढी आहे. म्हणजेच पालघर जिल्ह्यात अनुसूचित जमातीची संख्या कमालीची जास्त आहे . ठाणे व मुंबई नासिक या औदोगिक प्रदेशाशी जवळीक असल्याने या जिल्ह्यातील आदिवासींच्या विकासामध्ये आधुनिकीकर णाची भूमिका पडताळून पालघर जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील अन्य आदिवासींच्या विकास योजना आखण्यास चालना मिळू शकते.

४. संशोधन विषयाची निवड :

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा

प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास

हा विषय निवडण्यामागे खालील कारणे आहेत.

१.संशोधक हा ग्रामीण भागातला व अनुसूचित जाती प्रवर्गातील असल्याने ग्रामीण व अनुसूचित जाती जमातीच्या अडी अडचणी चा जवळचा परिचय आहे.

२.निवडलेल्या अभ्यास क्षेत्रामध्ये संशोधकाचे मागील ६ वर्षापासून वास्तव्य आहे. त्यामुळे या प्रदेशातील आदिवासींच्या संस्कृती व समस्यांशी परिचय आहे .

३.संशोधन क्षेत्रामध्ये वसई- विरार,पालघर,ठाणे, पश्चिम मुंबई उपनगरे,भिवंडी औद्योगिक क्षेत्रे तसेच पश्चिम रेल्वे चा विकास मार्ग संशोधन शेत्रापर्यंत विस्तारली आहेत . व या बदलाचा परि नाम आदिवासींच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारावर होताना पहावयास मिळतो.

४.आधुनिकीकरणाचा जास्तीत जास्त संबंध आल्यामुळे आदिवासींच्या जीवनमानात ,संस्कृती व आर्थिक क्रियामध्ये झालेला बदल अभ्यासणे आवश्यक आहे.

५.अभ्यास क्षेत्रातील विकास प्रक्रियेला चालना देण्यासाठी आदिवासी समुदायातील परिवर्तनाचा अभ्यास करून योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

६.संशोधाकांने निवडलेल्या अभ्यास क्षेत्रातील आदिवासी वर संशोधन झालेली आहेत, परंतु आधुनिकीकरणाचा आदिवासींच्या जीवनपद्धती, संस्कृती, आरोग्य, आर्थिक स्थिती यांचा सर्वसमावेशक अभ्यास केला गेलेला नाही . या क्षेत्रातील भविष्यकालीन नियोजनासाठी व अभ्यास क्षेत्रा तील आदिवासींचे जीवनमान उंचाविण्यासाठी सदरचे संशोधन उपयुक्त ठरेल .

.

५. संशोधनाची उद्दिष्टे :

१. अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक आणि सामाजिक – आर्थिक रूपरेषा अभ्यासणे.

२. अभ्यास क्षेत्रातील आदिवासी समुदायाचा सामाजिक , आर्थिक व आरोग्यविषयक जीवनाचा अभ्यास करणे.

३. अभ्यास क्षेत्रातील आदिवासी समुदायाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व आरोग्यविषयक जीवनावर आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

४.आदिवासी समुदायाच्या विकासामध्ये शासकीय व अशासकीय योजनांची भूमिका अभ्यासणे.

५.आधुनिकीकरणाच्या संदर्भाने आदिवासी समुदायांच्या विकासाचा स्तर अभ्यासणे.

६. भौगोलिक दृष्टीकोनातून आदिवासींच्या विकासासाठीचे नियोजन सुचविणे .

६. संशोधनाची गृहितके :

१. आदिवासींची सामाजिक – आर्थिक परिस्थिती बिकट आहे .

२. आदिवासींमध्ये साक्षरतेचा दर कमी आहे.

३. इतर समाजाच्या तुलनेत आदिवासींचे आरोग्य खालावलेले आहे.

४. शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांच्या बाबतीत आदिवासींमध्ये जागरूकतेचा अभाव आहे.

५.पालघर जिल्ह्यातील आदिवासींचे परंपरागत आर्थिक क्रियावरील निर्भरत्व कमी झालेले आहे.

७. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाचा विषय पालघर जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास

असला तरी पालघर जिल्ह्यातील एकूण ८ तालुक्यांपैकी वसई ,पालघर, वाडा व डहाणू या आधुनिकीकरणाचा प्रभाव असलेली तालुके संशोधनाचे व्याप्तीक्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे.

या अभ्यास क्षेत्रातील औद्योगिकीकरण व आधुनिक विकसित समाजाच्या प्रभाव क्षेत्रातील आदिवासी वसाहती केंद्रबिंदू मानून संशोधन केले जाणार आहे. पालघर जिल्ह्यांतर्गत येणारे जव्हार, मोखाडा, विक्रमगढ व तलासरी या तालुक्यांचा व इतर जिल्ह्यांचा अभ्यास येथे केला जाणार नाही. हि सदरील संशोधनाची मर्यादा आहे.

औद्योगिकीकरणाचा व आधुनिकीकरणाचा पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो त्यामुळे या परिणामाचा अभ्यास सदरील संशोधनात केला जाणार आहे.

हे संशोधन पालघर जिल्ह्यातील निवडक ४ तालुक्यातील आदिवासी समुदाया पुरतेच मर्यादित आहे .यात राज्यातील दुसऱ्या जिल्ह्यातील आदिवासी समुदायाचा किंवा अभ्यास क्षेत्रातील इतर समुदायाचा अभ्यास केला जाणार नाही.

८. नमुना निवड :

सामाजिक शास्त्रात लोकसंख्या अध्ययनाच्या पँरामेट्रिक पद्धती आणि नॉन पँरामेट्रिक पद्धती या दोन पद्धती आहेत. पँरामेट्रिक पद्धती म्हणजे ज्याद्वारे संपूर्ण समूह किंवा लोकसंख्या यांना परीक्षणाचे क्षेत्र मानून संशोधन व सर्वेक्षण केले जाते. तर नॉन पँरामेट्रिक पद्धतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून एका विशिष्ट समूहाची निवड करून त्यांचे अध्ययन केले जाते. नॉन पँरामेट्रिक पद्धतीद्वारे करण्यात आलेले अध्ययन सरल, विश्वसनीय आणि कमी खर्चाचे असते. नमुना हा नॉन पँरामेट्रिक पद्धतीचा आधार आहे. नमुना हा विश्व किंवा समग्रातून निवडण्यात आलेला भाग असतो. प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

नमुना निवड हि सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात येणार आहे. वर्णनात्मक अध्ययनामध्ये संशोधक निर्धारित संशोधन विश्वातील प्रत्येक व्याक्ती च्या वर्तन, प्रवृत्ती, अभिवृत्ती यांच्या वर्णनाची

गरज असतेच असे नाही, म्हणून समग्रातील काही एककांना नमुना म्हणून निवडून अभ्यास करणे हे उपयुक्त ठरते.

या तत्वाला गृहीत मानून व संशोधनासाठी विशेष संदर्भ म्हणून निवडलेल्या प्रत्येक तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रानजीकची, आधुनिकीकरण प्रभाव क्षेत्रातील एका तालुक्यातील १० गावे अशी ४ तालुक्यातील एकूण ४० गावे नमुना म्हणून निवडण्यात येणार आहेत. प्रत्येक गावातून १० आदिवासी कुटुंबे अशी एकूण ४०० कुटुंबाची निवड नमुना म्हणून करण्यात येणार आहे.

९. संशोधन पद्धती:

संबंधीत संशोधानाची संशोधन पद्धती खालील प्रमाणे ;

१.प्रथम प्राथमिक आणि दुय्यमस्त्रोतांच्या आधारे तथ्य संकलन केले जाईल यासाठी प्रत्यक्षनिरीक्षण, मुलाखत, व्यक्तिगत पत्रव्यवहार, प्रश्नावली ईत्यादी चा वापर करण्यात येणार आहे .शिवाय दुय्यम स्त्रोतांच्या आधारे शासकीय अहवाल, विशेषांक, जनगणना पुस्तिका,नकाशे,मासिके, ग्रंथाद्वारे माहिती गोळा केली जाईल.

२.माहिती गोळा केल्यानंतर त्या माहिती चे तालीकाकरण केले जाईल यासाठी समग्र गुणवैशिष्ट्यां चा आधार घेतला जाईल.

३.तालीकीकरणानंतर माहितीचे पृथक्करण केले जाईल. यासाठी केंद्रीय प्रवृत्तीचे परिमाणे व विचलन शिलतेचे परिमाणे यांचा वापर केला जाईल.

४.पृथ:करणा नंतर आलेल्या निष्कर्षाचे सादरीकरण नकाशे, आलेख आणि आकृती यांच्या साह्याने केले जाईल. त्यात तुलनात्मक व सहसंबंधात्मक माहिती विविध आलेख व आकृत्यांच्या साह्याने दर्शविले जाईल.

५.अभ्यास क्षेत्रातील माहिती गोळा करून अभिक्षेत्रीय वितरण छाया पद्धती नकाशे, टिंब पद्धती नकाशे, रंग पद्धती नकाशे ई. साह्याने दर्शविले जाईल.

१०. माहितीचे स्त्रोत व अभ्यास पद्धती :

संबंधित संशोधनासाठी माहितीचे स्त्रोत खालील प्रमाणे.

१.प्राथमिक स्त्रोत.

विशिष्ट प्रश्नावली, व्यक्तिगत मुलाखत, वैयक्तिक पत्रव्यवहार इत्यादी.

2. द्वितीय स्त्रोत.

संदर्भ ग्रंथ, मासिके, महाराष्ट्र शासनाची प्रकाशने, जनगणनापुस्तक, गॅझेटीयर्स, भारतीय स्थलदर्शक नकाशे ई.

माहिती संकलन, तालीकाकरण आणि पृथ:करण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या संशोधन पद्धती खालील प्रमाणे :

अ) सांखिकीय पद्धत.

या मध्ये दोन घटकामधील सहसंबंध व तुलना दाखविण्यासाठी वेगवेगळया सांख्यकीय पद्धतीचा वापर करून माहितीचे पृथ:करणकेले जाईल.

ब) ग्रंथालय पद्धत.

यामध्ये संदर्भ ग्रंथ, अहवाल, मासिके, विशेषांक, नकाशे इत्यादी चा वापर केला जाणार आहे.

क.) प्रश्नावली पद्धत.

माहिती संकलनासाठी प्रश्नावली तयार करून अभ्यास क्षेत्रातील संबंधीत घटकाकडून भरून घेतली जाईल.

उपरोक्त संशोधन पद्धतीशिवाय गरजेनुसार वेगवेगळ्या संशोधन पद्धतीचा वापर केला जाईल.

११. प्रकरणांची विभागणी.

प्रकरण १.प्रस्तावना.

प्रकरण २. संबंधीत साहित्याचा आढावा .

प्रकरण ३. अभ्यास क्षेत्राची भौगोलिक आणि सामाजिक-सांस्कृतिक रूपरेषा.

अ.) प्राकृतिकरूपरेषा.

यात पालघर जिल्ह्याचे स्थान, क्षेत्रफळ, भूमी, पर्जन्यमान,हवामान ई. चा मागोवा घेतला जाईल.

ब.) सामाजिक- आर्थिकरूपरेषा.

यात जलसिंचन,पर्यटनस्थळे, पीकरचना, वाहतूक व दळणवळण आणि औद्योगिकता ई. चा मागोवा घेतला जाईल.

क.) लोकसंख्या शास्त्रीय रूपरेखा.

यात लोकसंख्या, वाढ व विकास, घनता शाळाव महाविद्यालये ई. चा मागोवा घेतला जाईल.

प्रकरण ४. आदिवासी समुदायाचा सामजिक व आर्थिकस्तर

प्रकरण ५. आदिवासी समुदायाच्या सामाजिक –सांस्कृतिक जीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव

प्रकरण ६. आदिवासी समुदायाच्या आर्थिक व आरोग्यविषयकजीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव

प्रकरण ७. आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा स्तर

प्रकरण ८. निष्कर्ष व उपाययोजना .

१२. संदर्भ ग्रंथ

१..गोडबोले प्रशांत (१९९४) " आदिवासी कथा आणि व्यथा" प्रचीती प्रकाशन, मुंबई.

२.मे.पुं.रेंगे- मराठी विश्वकोश खंड १६-१९९५. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ-मुंबई . पृ.क्र.८३.

३.आदिवासी सामाजिक व आर्थिक सांख्यिकी (२०११) कोकण विभाग.

४.भारतीय जनगणना अहवाल २००१,२०११.

५.डॉ.गोरे गोविंद (२००२) "महाराष्ट्रातील आदिवासी जमाती " कॉन्तीनेन्तलप्रकाशन,विजयनगर पुणे.

६.डॉ.विठ्ठल घारपुरे (२००८) "सामाजिक व सांस्कृतिक भूगोल " पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.

७. आदिवासी संशोधन पत्रिका " आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे "

८. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पुणे .

गुरुनाथ नाडगोडे " भारतीय आदिवासी " कॉन्टिनेन्तल प्रकाशन पुणे.

प्रा.डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी
(मार्गदर्शक)

श्री.विशाल विजयकुमार सोनकांबळे
(संशोधक)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या ग्रंथालयास संशोधनआराखडा सादर

विषय : **भूगोल (geography)**

संशोधन शिर्षक

“ संशोधनाचा विषय पालघर जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास

संशोधकाचीमाहिती

नाव	**श्री. विशाल विजयकुमार सोनकांबळे**
मो. न.	८०८७६८१३७३ / ९२८४६८७४३५
ई – मेल	vishalshyam28.vs@gmail.com
संवर्ग	अनुसूचित जाती (एस. सी.)
दिव्यांग	नाही.

मार्गदर्शकाची माहिति

नाव	**प्रा. डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी**
मो. न.	९४२१५२७१८९
ई – मेल	kulkarnimukesh007@gmail.com
संशोधन केंद्र	महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर